क्र. १३५ पहिले वर्ष

२६ मार्च २०२३

# रविवारची  उपासना

## प्रायश्चित्तकाळातील पाचवा रविवार

### प्रस्तावना

आजच्या शुभवर्तमानात येशू म्हणतो, पुनरुत्थान व जीवन मीच आहे. पुनरुत्थान हा ख्रिस्ती विश्वासाचा आत्मा आहे. मार्था व मरिया ह्यांचा भाऊ लाजरस ह्याला आपल्या दैवी सामर्थ्याने येशूने जिवंत केले. ख्रिस्ताचे दु:खसहन, मरण व पुनरुत्थानाद्वारे आपणांस सार्वकालिक जीवन प्राप्त झाले. संत पौल म्हणतो, ''जे लोक जीवनाकडे केवळ ऐहिकदृष्ट्या पाहतात ते जीवनात कुठेही स्थिर होत नाहीत'' म्हणून प्रभू येशू ख्रिस्ताच्या वधस्तंभाच्या मृत्यूचा आणि पुनरुत्थानाचा अर्थ आपणांस समजावा व श्रध्देने आपण त्याच्या वचनाप्रमाणे आचरण करावे म्हणून प्रार्थना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे प्रभो, तुझा पुत्र ख्रिस्त याचे अनुकरण करण्यास आम्हांला कृपा दे. त्याने आम्हावर प्रीती केली व आमच्या उध्दारासाठी मृत्यूचा स्वीकार केला. त्याच्या प्रीतीतून आम्हांला प्रेरणा दे. त्याचा आदर्श आमच्यासमोर ठेव. तो तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात एकच परमेश्वर असून तो सर्वकाळ जिवंत राहतो व राज्य करतो.

**प्रभूशब्द विधी**

### पहिले वाचन

**यहेज्केल या पुस्तकातून घेतलेले वाचन ३७:१२-१४**

**''मी तुम्हांस माझा आत्मा देईन आणि तुम्ही सजीव व्हाल.''**

प्रभू परमेश्वर म्हणतो, ''माझ्या लोकांनो, पाहा, मी तुमच्या कबरा उघडीन, तुम्हांस तुमच्या कबरातून बाहेर काढून इस्राएल देशात आणीन. माझ्या लोकांनो, मी तुमच्या कबरा उघडून तुम्हांला बाहेर काढीन तेव्हा तुम्हांस समजेल की मी परमेश्वर आहे. मी तुमच्याठायी माझा आत्मा घालीन. तुम्ही सजीव व्हाल व मी तुम्हांस तुमच्या देशात वसवीन; तेव्हा मी परमेश्वर हे बोललो व मी तसे केले हे तुम्हास समजेल असे परमेश्वर म्हणतो.''

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

**१२९:१-८**

प्रतिसाद : **परमेश्वर दयानिधी आहे.**

१. हे परमेश्वरा, मी शोकसागरातून तुझा धावा करीत आहे. हे प्रभो, माझी वाणी ऐक; माझ्या विनवणीकडे कान लाव.

२. हे परमेश्वरा, तू पापे जमेस धरली, तर तुझ्यापुढे कोणाचा टिकाव लागेल? तरी पण आता तुझे भय धरावे याकरिता तुझ्याठायी क्षमा आहे.

३. माझा आत्मा परमेश्वराची अपेक्षा करतो आणि मी त्याच्या वचनाची आशा धरतो. पहाटेची वाट पाहणाऱ्या पहारेकऱ्यापेक्षा माझा जीव प्रभूची अधिक वाट पाहतो. (पहारेकऱ्याने पहाटेची आणि इस्राएलने परमेश्वराची आशा धरावी.)

४.हे इस्राएल, परमेश्वरावर श्रध्दा ठेव, कारण परमेश्वर दयानिधी आहे, त्याच्याजवळ उध्दारदाने विपुल आहे, तो इस्राएलास त्याच्या सर्व पापांपासून मुक्त करील.

### दुसरे वाचन

**पौलाचे रोमकरांस पत्र यातून घेतलेले वाचन ८:८-११**

**''ज्याने ख्रिस्त येशूला मेलेल्यातून उठवले त्याचा आत्मा तुम्हामध्ये आहे.''**

जे देवाच्या अधीन आहेत त्यांना देवाला प्रसन्न करता येत नाही. परंतु तुम्हांमध्ये देवाचा आत्मा जर वसती करीत आहे, तर तुम्ही देहाच्या अधीन नाही, आत्म्याच्या अधीन आहा. जर कोणाला ख्रिस्ताचा आत्मा प्राप्त झालेला नसेल तर तो ख्रिस्ताचा नाही. पण ख्रिस्त तुम्हांमध्ये असेल तर शरीर जरी पापामुळे मेलेले आहे, तरी आत्मा नीतिमत्वामुळे जिवंत आहे. ज्याने येशूला मेलेल्यातून उठवले त्याचा आत्मा जर तुम्हांमध्ये वसती करतो, तर ज्याने ख्रिस्त येशूला मेलेल्यातून उठवले तो तुम्हामध्ये वसती करणाऱ्या आपल्या आत्म्याने तुमची मर्त्य शरीरेही जिवंत करील.

**हा प्रभूचा शब्द आहे**

### जयघोष

**योहान ११:२५**

प्रभू म्हणतो, पुनरुत्थान व जीवन मीच
आहे, जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो
कधीही मरणार नाही.

### शुभवर्तमान

**योहानलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन ११:१-४५**

**''पुनरुत्थान व जीवन मीच आहे.''**

बेथानी येथील लाजरस नावाचा एक मनुष्य आजारी होता; मरीया व तिची बहीण मार्था त्याच गावच्या होत्या. ज्या मरीयेने प्रभूला सुगंधी तेल लावले व त्याचे चरण आपल्या केसांनी पुसले, तिचा हा आजारी पडलेला लाजरस भाऊ होता. *(त्या बहिणींनी येशूला कळवले की, ''प्रभूजी, ज्याच्यावर तुमचे प्रेम आहे, तो आजारी आहे.'' ते ऐकून येशू म्हणाला, ''हा आजार मरणासाठी नव्हे तर देवाच्या गौरवार्थ, म्हणजे त्याच्यायोगे देवाच्या पुत्राचा गौरव व्हावा यासाठी आहे.''

मार्था, तिची बहीण व लाजरस यांच्यावर येशूचे प्रेम होते तो आजारी आहे हे त्याने ऐकले तरी तो होता त्या ठिकाणीच आणखी दोन दिवस राहिला. त्यानंतर त्याने शिष्यांस म्हटले, ''आपण पुन्हा यहुदियात जाऊ या.'') शिष्य त्याला म्हणाले, ''गुरुजी, यहुदी नुकतेच तुम्हांला दगडमार करावयास पाहत होते, तरी तुम्ही पुन्हा तेथे जाता काय?'' येशूने उत्तर दिले, ''दिवसाचे बारा तास आहेत ना? दिवसा चालणाऱ्यांना ठेच लागत नाही, कारण त्याला पृथ्वीवरील उजेड दिसतो; परंतु रात्री चालणाऱ्याला ठेच लागते कारण त्याच्याजवळ उजेड नसतो,'' हे बोलल्यावर तो त्यांना म्हणाला, ''आपला मित्र लाजरस झोपला आहे; पण मी त्याला झोपेतून उठवावयास जातो.'' यावरून शिष्य त्याला म्हणाले, ''प्रभूजी, त्याला झोप लागली असली तर तो बरा होईल.'' येशू त्याच्या मरणाविषयी बोलला होता; परंतु तो झोपेपासून मिळणाऱ्या विश्रांतीविषयी बोलतो असे त्यांना वाटले. यास्तव येशूने त्यांना उघड सांगितले की, लाजरस मेला आहे आणि मी तेथे नव्हतो, तुम्हासाठी मला आनंद वाटतो, कारण माझी अशी इच्छा आहे की तुम्ही विश्वास ठेवावा. तरी आपण त्याच्याकडे जाऊ.'' तेव्हा दिदुम म्हटलेला थोमा आपल्या सोबत्यांना म्हणाला, ''आपणही त्याच्याबरोबर मरावयास जाऊ या.''

(येशू आला तेव्हा त्याला कळले की, त्याला कबरेत ठेवून चार दिवस झाले आहेत.) बेथानी यरुशलेमजवळ, म्हणजे तेथून पाऊण मैलावर होती तेथे यहुद्यांपैकी पुष्कळ लोक मार्था व मरिया यांचे त्यांच्या भावाबद्दल सांत्वन करण्यात आले होते. (येशू येत आहे हे ऐकताच मार्था त्याला जाऊन भेटली; पण मरिया घरात बसून राहिली. मार्था येशूला म्हणाली, ''प्रभूजी आपण येथे असता तर माझा भाऊ मेला नसता. तरी आताही आपण देवाजवळ काही मागाल ते देव आपणाला देईल, हे मला ठाऊक आहे.'' येशूने तिला म्हटले, ''तुझा भाऊ पुन्हा उठेल.'' मार्था त्याला म्हणाली, ''तो शेवटल्या दिवशी पुनरुत्थानसमयी पुन्हा उठेल हे मला ठाऊक आहे.'' येशूने तिला म्हटले,

“पुनरुत्थान व जीवन मीच आहे; माझ्यावर विश्वास ठेवणारा प्रत्येक जिवंत मनुष्य कधीही मरणार नाही. हे तू खरे मानतेस काय?” ती त्याला म्हणाली, “होय प्रभूजी, जगात येणारा देवाचा पुत्र ख्रिस्त आपणच आहात असा मी विश्वास धरला आहे.”)

असे बोलून ती निघून गेली व आपली मरिया हिला एकांती बोलावून म्हणाली, “गुरुजी आलेआहेत व ते तुला बोलावत आहेत.” हे ऐकताच ती त्वरेने उठून त्यांच्याकडे गेली. येशू अद्याप गावात आला नव्हता, पण मार्था त्याला भेटली त्या ठिकाणीच तो होता. जे यहुदी मरियेजवळ घरात होते व तिचे सांत्वन करत होते त्यांनी तिला चटकन उठून बाहेर जाताना पाहिल्यावर ती कबरेकडे रडावयास जात आहे असे समजून ते तिच्यामागे गेले. मग येशू होता तेथे मरिया आल्यावर त्याला पाहून ती त्याच्या पाया पडली व त्याला म्हणाली, “प्रभूजी, आपण येथे असता तर माझा भाऊ मेला नसता.” येशू तिला व तिच्याबरोबर आलेल्या यहुद्यांना रडताना पाहून आत्म्यात खवळला व विव्हळ झाला आणि म्हणाला, “तुम्ही त्याला कोठे ठेवले आहे?” ते त्याला म्हणाले, “प्रभूजी येऊन पाहा.” (येशू रडला. ह्यावरून यहुदी म्हणाले, “पाहा, ह्याचे त्याच्यावर कितीतरी प्रेम होते!” परंतु त्यांच्यातील कित्येक म्हणाले ज्याने आंधळ्याचे डोळे उघडले त्याला ह्याचे मरण टाळण्याचीही शक्ती नव्हती काय?”

येशू पुन्हा मनात कळवळून कबरेकडे आला; ती गुहा हेती आणि तिच्या तोंडावर धोंड ठेवलेली होती. येशूने म्हटले, “धोंड काढा.” त्या मृताची बहीण मार्था त्याला म्हणाली, “प्रभूजी, आता त्याला दुर्गंधी येत असेल; कारण त्याला मरून चार दिवस झाले आहेत.” येशूने तिला म्हटले, “तू विश्वास ठेवशील तर देवाचा गौरव पाहशील असे मी तुला सांगितले नव्हते काय?” ह्यावरून त्यांनी धोंड काढली. येशूने दृष्टी वर करून म्हटले, “हे बापा, तू माझे ऐकले म्हणून मी तुझे आभार मानतो. मला माहीत आहे की, तू सर्वदा माझे ऐकतोस. तरी जो लोकसमुदाय सभोवती उभा आहे त्यांच्याकरिता मी बोललो; कारण तू मला पाठवले आहे असा त्यांनी विश्वास धरावा.” असे बोलून त्याने मोठ्याने हाक मारुन म्हटले, “लाजर, बाहेर ये.” तेव्हा तो मेलेला होता तो बाहेर आला; त्याचे हातपाय प्रेतवस्त्रांनी बांधलेले व तोंड रुमालाने वेष्टिलेले होते. येशूने त्यांना म्हटले, “ह्याला मोकळे करून जाऊ द्या.”

मरियेकडे आलेल्या यहुद्यांनी त्याने जे केले ते पाहिले आणि त्यांच्यापैकी पुष्कळजणांनी त्याच्यावर विश्वास ठेवला.”)

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रप्रास्ताविक**

माझ्या बंधुभगिनींनो, आम्हांला सदैव प्रार्थना करण्याची गरज आहे आणि विशेषत: या प्रायश्चित्तकाळात तर अधिक प्रार्थना करण्याची गरज आहे : ख्रिस्तासह एकनिष्ठेने आम्ही जागृत राहायला हवे आणि आमच्या स्वर्गीय पित्याकडे प्रार्थना करायला हवी.

प्रतिसाद : **परमेश्वरा, करुणा करा, अमुची प्रार्थना स्वीकारा.**

१. आपले पोप, कार्डिनल्स, बिशप्स, धर्मगुरू व सिस्टर्स ह्यांनी आपणांस प्रभूच्या प्रेमाचा व शांतीचा संदेश देऊन आपणांस परमेश्वराच्याजवळ येण्यास मार्गदर्शन करावे म्हणून प्रार्थना करूया.

२. उपवासकाळ हा त्यागाचा काळ आहे. ह्या काळात सर्व तरुणतरुणींनी आपल्या जीवनावर विचारमंथन करून त्यांना प्रभूची सेवा करण्यासाठी हाक ऐकू यावी म्हणून आपण प्रार्थना करूया.

३. मेल्याशिवाय पुनरुत्थान नाही म्हणजेच आत्मत्यागाशिवाय प्रतिफळ नाही. ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचे सहभागीदार होण्यासाठी त्याच्या आत्मत्यागाचा, प्रीतीचा, शांतीचा व क्षमेचा संदेश इतरांपर्यंत पोहोचावा म्हणून प्रार्थना करूया.

४. आता थोडा वेळ शांत राहून वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करूया.

## समारोप

हे प्रभो, तुझे लोक पुन्हा तुझ्याकडे येवोत आणि संपूर्ण अंत:करणाने ते तुझी सेवा करात. श्रध्देने आम्ही तुझ्या साहाय्याची याचना केली आहे. आता आमच्या पापांचा त्याग करावा म्हणून, आपण प्रभूकडे प्रार्थना करू या.

## अर्पणावरील प्रार्थना

हे सर्वशक्तिमान परमेश्वरा, ख्रिस्ती श्रध्देने प्रभावित होणाऱ्या सर्वांची पापे ह्या बलिदानाच्या सामर्थ्याने नाहीशी कर. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे सर्वशक्तिमान बापा, तुझा पुत्र प्रभू येशू याचे आम्ही शरीर व रक्त स्वीकारले आहे व आमचे त्याच्याबरोबर ऐक्य घडून आले आहे. ख्रिस्ताबरोबर आमचे हे ऐक्य कायम टिकू दे. तो परमेश्वर असून सर्वकाळ जिवंत राहतो व राज्य करतो.

## चिंतन

गेल्या रविवारच्या वाचनांद्वारे ख्रिस्तसभेने आपल्याला अंधारातून प्रकाशाकडे वाटचाल करण्याचे आवाहन केले. आजची वाचनेआपल्याला मृत्यूकडून जीवनाकडे जाण्यास प्रवृत्त करतात. पहिल्या वाचनात (यहेज्केल ३७:१२-१४) बाबिलोनच्या हद्दपारीत खितपत पडलेल्या इस्राएली लोकांमध्ये नवजीवनाची आशा उत्पन्न करण्यासाठी संदेष्टा 'परमेश्वर त्यांची थडगी उघडून त्यांना नवजीवन देईल, असे भाकित करतो. दुसऱ्या वाचनात (रोम ८:८-११) संत पौल रोमकरांनी केवळ शारीरिक पातळीवर जीवन न जगता त्यांनी आध्यात्मिक नवजीवनाची वाट चोखाळावी असे आवाहन करतो. शुभवर्तमानामध्ये (योहान ११:१-४५) हा प्रवास चार टप्प्यांमध्ये सादर करण्यात आलेला आहे.

**अ) सांत्वनाचा टप्पा :** लाझरसच्या मृत्यूमुळे दु:खी झालेल्या बहिणींचे सांत्वन करण्यासाठी येशू बेथानी येथे येतो. त्याच्या थडग्याजवळ येशूने सांडलेले अश्रू दु:खी बहिणींना दिलासा देणारे होते.

**ब) आश्वासनाचा टप्पा :** 'प्रभुजी, आपण इथे असता तर माझा भाऊ मेला नसता' ह्या शब्दांत मार्था व मरिया ह्यांची येशूवरील गाढ श्रध्दा दिसून येते. येशू त्यांना आश्वासन देतो, लाझरस फक्त शेवटच्या दिवशी नव्हे तर आत्ताच पुन्हा उठणार आहे. हे आश्वासन येशूचे आत्मप्रकटीकरण करणारे आहे : “पुनरुत्थान व जीवन मीच आहे.”

**क)मुक्तीचा टप्पा :** “धोंड बाजूला सारा” ह्या येशूच्या आदेशामुळे क्षणभर उपस्थितांमध्ये चुळबुळ सुरू झाली. लाझरसच्या बहिणींना भावनावेग आवरेनासा झाला. येशू मात्र लाझरसला अंधारातून प्रकाशाकडे, मरणातून जीवनाकडे आणि बंधनातून मुक्तीकडे घेऊन जाण्याच्या हेतूने त्याला साद घालतो, 'लाझरस, बाहेर ये.”

ड) नवजीवनाचा टप्पा : येशू उपस्थितांना लाझरसचे हातपाय मोकळे करण्यास आणि त्याला जाऊ देण्यास सांगतो. हा आदेश म्हणजे लाझरसने स्वातंत्र्याची, प्रकाशाची व नवजीवनाची वाटचाल सुरू करण्याची आज्ञा होती. लाझरस मात्र नि:शब्दपणे आपल्या पुनरुत्थानाची घोषणा करीत राहतो.

**आत्मपरीक्षण :** माझ्या जीवनातील कोणकोणत्या क्षेत्रात मला मृत्यूकडून नवजीवनाकडे वाटचाल करण्याची गरज आहे? ●●●

| मार्च/एप्रिल २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | पहिला सप्ताह |
|---|---|---|
| सोम २७ | सं मार्गारिट क्लिथरो (जां) | : दानीएल १३:१-९,१५-१७,१९-३०,३३/योहान ८:१-११ |
| मंगळ २८ | सं सिक्स्टूस तिसरे (जां) | : गणना २१:४-९/योहान ८: २१-३० |
| बुध २९ | सं रूपर्ट (जां) | : दानीएल ३: १४-२५/योहान ८:३१-४२ |
| गुरु ३० | सं जॉन क्लिमॅकूस (जां) | : उत्पत्ती १७:३-९/योहान ८: ५१-५९ |
| शुक्र ३१ | मुरानोचे सं डॅनियल (जां) | : यिर्मया २०:१०-१३/योहान १०: ३१-४२ |
| शनि ०१ | स ह्य (जां) | : यहेज्केल ३७: २१-२८/योहान ११: ४५-५७ |